Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# जिव्हेपाशी आहे सूत्र

17 Jun 2011, 0303 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

कोणत्याही सामाजिक, राजकीय, व्यावसायिक संस्थेच्या व्यवस्थापनात दोन घटकांमधील संवादाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र अपेक्षित ध्येय गाठण्यासाठी, संकल्पित काम वेळेवर आणि यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी निव्वळ संवाद न साधता तो सुसंवाद कसा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. म्हणजे आपण ज्यांच्याबरोबर संवाद साधला त्यांनी तो नीट ऐकला आणि त्याप्रमाणे योग्य ती कृती केली आणि त्याचा अपेक्षित परिणाम झाला तरच तुमचा संवाद यशस्वी झाला असे म्हणता येईल. हा सुसंवाद कसा साधायचा याची काही सूत्रे समर्थ रामदासांनी सांगितली आहेत. ते म्हणतात,

हेतू समजून उत्तर देणे। दुसऱ्याचे जीवींचे समजणे।

मुख्य चातुर्याची लक्षणे। ती हीं ऐसी।।

समोरच्या व्यक्तीची, पक्षाची बाजू समजून न घेतल्याने व्यवहारात अनेकदा संवाद होऊ शकत नाही. काम अर्धवट राहते आणि त्याबद्दल दोन्ही पक्ष एकमेकांना दोषी ठरवून मोकळे होतात. समर्थांचे सांगणे दुसऱ्या बाजूनेही लागू पडते म्हणजे असे की तुम्हाला ज्यांच्याकडून काम करून घ्यायचे आहे त्यांची मनोभूमिका, विचारपद्धती, कार्यपद्धती समजून, जाणून घेतली तर आपण त्यांच्याशी सुसंवाद साधण्यात नक्की यशस्वी ठरू शकतो. मी हा अनुभव आमच्या तुळापूरच्या श्री संगमेश्वराच्या जीर्णोद्धाराच्या वेळी घेतला. या मंदिरात विजेच्या जोडण्या देताना एक ट्रान्सफॉर्मर चक्क मंदिराच्या अंतर्भागात बसवण्यात आला होता. जीर्णोद्धाराच्या वेळी तो ट्रान्सफॉर्मर हलवणे आवश्यक होते. तेव्हा अजित निंबाळकर हे विद्युत मंडळाचे अध्यक्ष होते. मी त्यांच्यासह तिथल्या वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांची मिटिंग घेतली. त्या मिटिंगमध्ये मी फक्त इतकेच सांगितले की संगमेश्वराच्या मंदिरातील तो ट्रान्सफॉर्मर ज्या खांबावर आहे तो जुना झाला असून उद्या जीर्णोद्धारानंतर मंदिरात भाविकांची वर्दळ वाढल्यावर चुकून काही अपघात झाला तर त्याची जबाबदारी तुमच्या खात्यावर येईल. माझ्या या सांगण्याचा अपेक्षित झटका बसला आणि आठवड्यातच तो ट्रान्सफॉर्मर तिथून हलला. सरकारी खात्याच्या कार्यपद्धतीचा, मानसिकतेचा परिचय असल्याने त्यांना कळेल अशाच प्रकारे संवाद साधल्यावर अपेक्षित परिणाम पाहायला मिळाला.

तुम्हाला हाताखालच्या कर्मचाऱ्यां-कडून काम करून घ्यायचे असेल तर त्यांच्याशी गोड शब्दात संवाद साधावा. एखाद्यावर जबाबदारी सोपविताना त्याला ते काम नक्की काय आहे, ते कसे आणि किती दिवसांत पूर्ण करायचे आहे हे नीट समजले आहे याची खात्री करून घ्यावी. समोरच्याकडून अपेक्षित कामगिरी झाली नाही म्हणून त्याला कटु बोल ऐकवण्यापेक्षा आधीच त्याच्याशी सुसंवाद साधायचा प्रयत्न करा. समर्थ सांगतात,

कठिन शब्दे वाईट वाटते। हें तो प्रत्ययास येतें।

तरी मग वाईट बोलावे ते। काय निमित्य।।

पेरिलें ते उगवतें। बोलण्यासारीखे उत्तर येते।

तरी मग कर्कश बोलावे तें। काये निमित्ते।।

व्यवस्थापकाने किंवा नेत्याने संवाद साधताना दुसऱ्यांच्या मनाचा विचार केला तरच तो सुसंवाद होतो. समर्थ असेही सांगतात की जगामध्ये जगमित्र। जिव्हेपासीं आहे सूत्र।।. ज्याच्याकडे चांगले बोलण्याची कला आहे तो जगाशी मैत्री करू शकतो. आपल्या वक्तृत्वाच्या प्रभावाने जो दुसऱ्याचे मन जिंकतो तो प्रभावी व्यवस्थापक / नेता होऊ शकतो. कोणाही व्यवस्थापकाने / नेत्याने स्वत:च्या ज्ञानाने अहंकारी होऊन आपल्यापेक्षा कनिष्ठांशी बोलणे टाळू नये. उलट त्यांच्याशी सुसंवाद साधून त्यांचे मनोगत जाणून घ्यावे. सुसंवाद साधून कार्यभाग साधण्याची इच्छा असलेल्या व्यवस्थापकासाठी हे सूत्र फार महत्त्वाचे आहे.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap
Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768